**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २७/०७/२००९

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.३ शुक्रवार दि.३१/०७/२००९ सकाळी ११.३०** वाजता महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ३**
**सन-२००९-२०१०**
**शुक्रवार दिनांक - ३१/०७/२००९ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्रमांक** | **विषय** |
|---|---|
| ३८ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये श्री. शेख आदिल अहमद इसहाक, श्री. गायकवाड अभिजीत लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची तात्पुत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंते पदी कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुकी करणेस मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३९ | अहमदनगर महानगरपालिकेचे विधी तज्ञांचे पॅनलशिपवर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार ॲड. श्री. व्ही.एस.बेंद्रे, ॲड. श्री. किशोर एन. लोखंडे, ॲड. सौ. मंगला कोठारी व ॲड. श्री. तुळशीराम बाबर यांचा अर्ज व त्याचा पॅनलशिपवरील कालावधी व मानधन ठरविणे बाबत प्रस्ताव निर्णयार्थ. |
| ४०. | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६१ मधील बुरूडगांव अंतर्गत श्री. शिवाजी बोरगे घर ते श्री. साळवे घर व श्री. देवकर घर ते श्री.कांबळे घर ते श्री.जाधव घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे चे कामास व एस्टीमेट रूपये १,५०,१८३/- चे खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४१ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४९ मधील बौध्द वस्ती अंतर्गत ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ४,९५,६८०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** विषय-क्रमांक ३८ ते ४१ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-३**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३८ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

ठराव क्रमांक -३८ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेमध्ये श्री.शेख आदिल अहमद इसहाक,श्री. गायकवाड अभिजीत लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची तात्पुत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंते पदी कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुकी करणेस मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय-श्री. शेख आदिल अहमद इसहाक, श्री. गायकवाड अभिजीत लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुकी बाबत.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये शहर अभियंता व मॅकेनिकल इंजिनिअर यांच्या प्रस्तावाप्रमाणे कनिष्ठ अभियंते यांची संख्या अपुरी असल्यामुळे श्री. शेख आदिल अहमद इसहाक, यांची ॲटो मोबाईल इंजिनिअर या पदी व श्री. गायकवाड अभिजित लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची कनिष्ठ अभियंता या पदी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने मुळ प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे मानधनावर नेमणुकी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे आस्थापन प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- आजचे सभेस आवश्यक असलेला कोरम पूर्ण झाल्याने सभेस सुरूवात करावी. पहिला विषय वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे अजेंडया वरील विषय क्रमांक ३८ वाचून दाखविणेत आला.

मा.उपायुक्त हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव सभे मध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- मा.स्थायी समिती सभेच्या अजेंडा मा. सदस्यांना किती दिवस अगोदर दिला जातो. तसेच आम्हाला आमचा विषय सभेपुढे मंजूरी साठी घेणेसाठी काय करावे लागेल.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सदस्यांना सभेपुर्वी तीन दिवस अगोदर अजेंडा देण्यांत येतो.

नगरसचिव श्री. हब्बु एस.एस. :- मा. सदस्यांचा प्रस्ताव विभाग प्रमुखाकडून स्थायी समिती मध्ये यावयास हवा विभागा प्रमुख मा. सदस्यांचे यादीवर मा.उपायुक्त साहेब यांचेकडेस ऑफिस रिपोर्ट सादर करून त्यावर सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती सभे पुढे अगर मा. महानगरपालिका सभेपुढे घेणे विषयी शिफारस घेउत्न मा.आयुक्त साहेब यांचे मंजूरीने प्रस्ताव मा.स्थायी समिती अगर महानगरपालिका सभेकडेस मंजूरीसाठी सादर करण्यांत येतो.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- म.न.पा.चे इंजिनिअर यांना कामाचे साधे अंदाजपत्रक ही तयार करता येत नाही ते बोहरून तयार करून घेतले जाते. बांधकाम विभाग कडून कामाची तपासणी होत नाही. कामाची आवश्यकता पाहिली जात नाही. पदवीधर आवश्यक असतांना त्यांना न नेमता पदाधिका-यासाठी नेमणूका करावयाच्या आहेत क?

मा.सभापती साहेब :- मा.सदस्यानी अजेंडया वरील प्रस्तावावर चर्चा करावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. सदस्यांनी प्रस्तावावर चर्चा करावी. कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कनिष्ठ अभियंत्याची मानधनावर नेमणूक करावयाची किंवा नाही यावर चर्चा करावी. मॅके. इंजि. यांनी प्रस्तावाची माहिती सभेस द्यावी.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- महानगरपालिके मध्ये कनिष्ठ अभियंत्याची संख्या अपुरी आहे. ॲटो मोबाईल इंजिनिअर चे पद रिक्त आहे. आपलेकडे कचरा वाहतुकीसाठी ४० वाहने आहेत. त्याचं देखभाली साठी ॲटो मोबाईल इंजिनिअरची व बांधकाम विभागाकडेस आवश्यकता असलेने हा कनिष्ठ अभियंत्याची आवश्यकता असलेने वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन्न श्री. शेख आदिल अहमद इसहाक व श्री. गायकवाड अभिजित लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची कनिष्ठ अभियंता या पदी कंत्राटी पध्दतीने रूपये ६,०००/- दरमहा मानधनावर सहा महिन्याचे कालावधी साठी नेमणूक केली होती. त्यांची मुदत संपलेली असल्याने व म.न.पा. मध्ये ॲटो मोबाईल इंजिनिअर चे पद रिक्त असल्याने व कनिष्ठ अभियंते यांची संख्या अपुरी असल्याने त्यांची नेमणूक करणे बाबत प्रस्ताव आस्थापना विभागाकडेस पाठविलेला आहे.

मा.श्री. शेंडगे सं.छ. व मा.श्री. पंजाबी ज.निं.:- कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेले अभियंते कामावर येतात का ?

मा. उपायुक्त श्री. हांगे साहेब :- दोन अभियंते कामावर नाहीत.

मा.श्री. पवार बा.रे.:- सदर अभियंत्या बाबत मा. सदस्यांच्या तक्रारी आहेत.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- क्वॉलीफाईड अभियंते घेतले जात नाहीत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- क्वॉलीफाईड कर्मचारी भरले जात नाही हे म्हणून चुकीचे आहे सध्या संपुर्ण महाराष्ट्रामध्ये बिगर क्वॉली फाईड कर्मचा-यांच्या नेमणूका केल्या जात नाहीत. वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन्न अर्ज मागवून , उमदेवाराच्या इन्टरव्हू घेउन्न त्यांना कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमलेले आहे. त्यांचे भरती बाबत मत व्यक्त करतांना मा.सदस्यांनी या गोष्टीची विचार करावा त्यामुळे गैरसमज होतो. क्वॉलीफाईड नसलेल्या कर्मचा-यांची नेमणूक आम्ही केलेली नाही व भविष्यात ही करणार नाही.

सहा महिन्याकरिता मानधनावर नेमणूका करणेची परवानगी आहे. अडचणीचे वेळी तिद्या अभियत्यांना कंत्राटी पध्दतीने मानधनावर घेतले होते. आचारसंहिता व मा.स्थायी समिती अस्तित्वात नव्हती तेव्हा म.न.पा.वर नागरिकांचा मोर्चा आला होता. तेव्हा झालेल्या मिटींग मधील निर्णयानुसार दोघांना घेतले होते. त्या पैकी एक अभियंता कामावर आलेला आहे. त्याला ठेवायचे किंवा नाही हे मा. सदस्यांनी ठरवावे.

मा. श्रीमती ढोणे मा.सु.:- कामावर ठेवा.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- आवश्यकता असेल तर ठेवावे कधी कधी मागवून ही ते मिळत नाहीत.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :-या तिद्यांपैकी श्री. शेख आदिल अहमद इसहाक यांचे काम चांगले आहे.

मा.श्री. पंजाबी ज.नि.:- प्रस्ताव तहकुब ठेवाव.

मा.श्री.पवार बा.रे.:- मा.सदस्यांच्या सदर अभियंत्या विषयी तक्रारी आहेत. प्रस्ताव रद्द करून वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन्न सदर कनिष्ठ अभियंत्याची कंत्राटी पध्दतीने रितसर नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.पवार द.ज. :- प्रस्ताव रद्द करून जाहिरात देउन्न नेमणूक करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- कनिष्ठ अभियंत्याची मानधनावर नेमणूका करणे बाबत प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्यांत यावा व वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन्न कंत्राटी पध्दतीने सदर पदे मानधनावर भरण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये श्री.शेख आदिल अहमद इसहाक,श्री. गायकवाड अभिजीत लालेश व श्री. लखापती अजय अरूणराव यांची तात्पुत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंते पदी कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुकी करणेस मंजुरी मिळणे बाबत प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्यांत यावा. व म.न.पा. मध्ये कंत्राटी पध्दतीने मानधनावर भरावययाचे कनिष्ठ अभियंत्याचे पदासाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन्न अर्ज मागवून रितसर नेमणूका करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-३**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३९ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

ठराव क्रमांक -३९ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विधी तज्ञांचे पॅनलशिपवर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार ॲड. श्री. व्ही.एस.बेंद्रे, ॲड. श्री. किशोर एन. लोखंडे, ॲड. सौ. मंगला कोठारी व ॲड. श्री. तुळशीराम बाबर यांचा अर्ज व त्याचा पॅनलशिपवरील कालावधी व मानधन ठरविणे बाबत प्रस्ताव निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय-अहमदनगर महानगरपालिकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात विधी तज्ञांचे पॅनलशिपवर नेमणुकी बाबत.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये विधीतज्ञ म्हणून १. ॲड. श्री.व्ही. एस. बेंद्रे २. ॲड. श्री. किशोर एन. लोखंडे ३. ॲड. सौ. मंगला कोठारी, ४. ॲड. श्री.तुळशीराम बाबर यांनी विनंती अर्ज दिलेला आहे.

तरी सदर अर्जाचा विचार होवून अहमदनगर महानगरपालिकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात विधीतज्ञ म्हणून पॅनलशिपवर कालावधी व मानधनाबाबत निर्णय घेणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे आस्थापन प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३९ वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे विषय क्रमांक ३९ हा सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा

त्याप्रमाणे विषय क्रमांक ३९ प्रस्तावना सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आली.

मा.श्री. पंजाबी ज.निं.:- या पुर्वी ॲडव्होकेट होते का ?

आस्थापना प्रमुख श्री. साबळेः- ॲड. श्री. लटंगे, ॲडव्होकेट ॲड. श्री. पाटिल व ॲड.सौ. नगरकर मॅडम या विधीतज्ञांच्या महानगरपालिकेच्या पॅनलशिपवर नेमणूक केलेल्या आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- औरंगाबाद हायकोर्ट येथील महानगरपालिकेचे काम पहाणेसाठी ॲड. श्री. विजय लंटगे , व नगर येथील औद्योगिक व कामगार न्यायालयामधील कामासाठी ॲड. श्री. एस.के. पाटिल व सिव्हील व फौजदारी न्यायालया मधील कामासाठी ॲड.सौ.एस.एस. नगरकर मॅडम यांच्या नेमणूका केलेल्या आहेत. ॲड. श्री. बेंद्रे व्ही.एस., ॲड. श्री. किशोर एन. लोखंडे यांनी अर्ज देउन्न औरंगाबाद हायकोर्ट येथे व ॲड सौ. मंगला कोठारी व ॲड. श्री. तुळशीराम बाबर यांनी विधीतज्ञाचे पॅनलवरील ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करणे बाबत विनंती केले वरून प्रशासनाने प्रस्ताव सादर केला आहे. आपले महानगरपालिकेचे विधीतज्ञा बाबतचे नियम तयार झालेले नाहीत त्यास मा. महासभेचे व मा. शासनाचे मंजूरी नंतर अंमलात येतील तो पर्यत ॲडव्होकेट पॅनलवर नेमणूका करणेत याव्यात व त्यांना घ्यावयाच्या मानधन रक्कम ठरविणे आहे. ॲडव्होकेट श्री. लंटगे यांना रूपये ९,०००/- मानधन देण्यांत येते नेमावयाच्या ॲडव्होकेट यांचे मानधन केसेस प्रमाणे ठरावून द्यावे हायकोर्टामधील एका केसचे मॅटरसाठी रूपये पांच हजार व सौ. नगरकर मॅडम यांना रूपये दोन हजार देत असतांना यांना कागद पत्राचे खर्चासह रूपये अडीच हजार पर्यत एक केस साठी मानधन ठरवावे.

मा.श्री. पंजाबी ज.निं. :- यांची सर्वाची नेमणूक न करतां दोनच ॲडव्होकेटची नेमणूक करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- महानगरपालिकेच्या मे. कोर्टा मध्ये किती केसेस होत्या किती निकाली झाल्या पॅनल शिपवरील वकीलामुळे महानगरपालिकेचा फायदा झाला का ? प्रलंबित केसेस मुळे प्रकरणाचा निपटारा होत नाही. कामकाज फारसे गतीमान दिसून येत नाही ॲड. सौ. नगरकर यांचे कडील ८५० ते ९०० केसेस प्रलंबित आहेत. तसेच औरंगाबाद उच्चा न्यायालय येथे ही महानगरपालिकेच्या ६० ते ६५ केसेस प्रलंबित आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- एकूण नउञ हजारापर्यत केसेस होत्या त्या पैकी सन ९५ सालापासून तीन हजार केसेस निकाली झालेल्या आहेत. त्यामध्ये तडजोडीने केलेल्या केसेस आहेत.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- नउञ हजार केसेस पैकी तीन हजार केसेस निकाली आहेत. त्यावर प्रशासन समाधानी आहे का ? महानगरपालिकेच्या बाजूने किती निकाल लागले व विरूध्द किती गेले.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- नागरिकांना घरपट्टी जादा आली म्हणून ते मे. कोर्टात केसेस दाखल करतात कोर्टा मध्ये त्यांचेशी तडजोड करून अशा केस निकाली काढल्या जातात मी आले पासून सिव्हील मॅटर मध्ये एकही केसचा निकाल आपले विरूध्द गेलेला नाही. प्रशासन ठरावानुसार विधी तज्ञांचे पॅनल तयार केले पासून आता पर्यत एकूण २९७७ केसेस निकाली झालेल्या आहेत.

मा.श्री. पवार द.ज. :- प्रत्येक केसेस प्रमाणे मानधन देणे परवडणारे नाही त्यांना पूर्वीचे मानधनावर ठेवावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पॅनलशिपवर नेमणे झाल्यास जाहिरातीने अर्ज मागवून त्यांचा मुलाखत घेउञ्न नेमणूक करावी लागेल त्यांना पर केस प्रमाणेचे मानधनावर नेमावे.

मा.श्री. पवार बा.रे.:- महानगरपालिकेच्या पॅनलशिपवर ठराविक मानधनावर नेमणूक कराव्यात.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार अर्जदार एक ते चार यांना ॲडव्होकेट पॅनलवर घेण्यात यावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आताच महानगरपालिकेची महासभा झालेली आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सर्वाना माहित आहे. मागिल महिन्याचा पगारच चौदा तारखेला करण्यांत आला होता. या महिन्याचे पगाराचे निश्चित सांगता येत नाही. महानगरपालिकेची जमा बाजू व कर्मचा-यांचे पगाराचा खर्च हा नियमा पेक्षा जास्त होता कामा नये. अर्जदार यांना ॲडव्होकेट पॅनलवर घ्यावयास विरोध नाही.महानगरपालिकेची स्थिती सभागृहासमोर ठेवणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. पॅनलशिपवर मानधनावर घ्यावयाचे झाल्यास त्यांची मुलाखती घेउञ्न निर्णय घ्यावा लागेल.

मा.श्री. शेंडगे सं.छ. व मा.श्री. पंजाबी ज.निं.:- प्रस्ताव तहकुब ठेवावा जाहिरात देउञ्न पॅनलशिपवर ॲडव्होकेट नेमावे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- जाहिरात देउञ्न अर्ज मागविल्यास खुली स्पर्धा होईल.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- अर्जदार यांना पॅनलशिपवर घेण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ॲडव्होकेट पॅनलवर केसेस प्रमाणे रूपये २,५०० व ५,०००/- हायकोर्ट याप्रमाणे केसेस साठी मानधन निश्चित करावे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउञ्न जागा भराव्यात

मा.सभापती साहेब :- यापुर्वी जाहिरात दिली नाही आता का ?

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-ॲड.श्री. बेंद्रे व इतर तीन यांची विधीतज्ञाचे पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करावी.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- आम्हा सर्व विरोधकांचा विरोध नोंदवावा.

मा.श्री. पवार बा.रे.:- ॲडव्होकेट पॅनलावरील पूर्वी कार्यरत असलेले विधीतज्ञ यांना कार्य मुक्त करावे. व अर्जदार ॲडव्होकेट श्री. व्ही.एस.बेंद्रे, ॲडव्होकेट श्री. किशोर एन.लोंखडे, (औरंगाबाद उच्चा न्यायालय) यांना दरमहा रूपये १२,०००/-,ॲड. सौ. मंगला कोठारी व ॲड. श्री. तुळशीराम बाबर यांची दरमहा रूपये १०,०००/- चे मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे विधीतज्ञांचे पॅनलशिप वरील पुर्वीचे विधीतज्ञ यांचा पुर्वानुभव पहाता ऑफिस रिपोर्टानुसार कार्यमुक्त करणेत यावे व अर्जदार ॲड.श्री. बेंद्रे व ॲड.श्री. लोंखडे यांची औरंगाबाद उच्च न्यायालय येथे रूपये १२,०००/- व ॲड.सौ. कोठारी व ॲड. श्री.बाबर यांची अहमदनगर येथील महानगरपालिकेच्या न्यायालीन केसेस पहाणे कामी रू.१०,०००/-दरमहा मानधनावर नेमणूका करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे विधी तज्ञांचे पॅनलशिपवर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार ॲड. श्री. व्ही.एस.बेंद्रे,ॲड.श्री. किशोर एन.लोखंडे,ॲड.सौ.मंगला कोठारी वॲड.श्री. तुळशीराम बाबर यांचा अर्ज व त्याचा पॅनलशिपवरील कालावधी व मानधन ठरविणे बाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे विधीतज्ञांचे पॅनलशिपवर पूर्वी कार्यरत असलेल्या विधी तज्ञा पैकी १] ॲड. श्री. व्ही.पी.लटंगे , औरंगाबाद हायकोर्ट २] ॲड.सौ. एस.एस. नगरकर, दिवाणी व फौजदारी न्यायालय अ.नगर यांना कार्यमुक्त करण्यांत यावे. त्यांचे कडील असलेले कागदपत्र व इतर तद्नुंषगिक दस्त ऐवज कामगार अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका यांनी ताब्यांत घेवून सदर कागदपत्रे या ठरावानुसार मानद नियुक्त करण्यांत आलेल्या विधीतज्ञांना देणे बाबत कार्यवाही करावी.ॲड.श्री. व्ही.एस.बेंद्रे, ॲड.श्री. किशोर एन.लोंखडे, (औरंगाबाद उच्च न्यायालय) यांना दरमहा रूपये १२,०००/-(रूपये बारा हजार फक्त)ॲड. सौ. मंगला कोठारी व ॲड. श्री. तुळशीराम बाबर यांची दरमहा रूपये १०,०००/-(रूपये दहा हजार फक्त) चे मानधनावर पुढील आदेश होईपावेतो नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेल्या निवड प्रक्रिये ऐवजी वरील विधीतज्ञांचा पुर्वानुभव या सभेने विचारात घेतला आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सदरचे ठराव मंजूरीस मा.श्री. लोंढे शिवाजी बाळासाहेब,मा.श्री.पंजाबी जसपाल निरंजनसिंग, मा.श्रीमती ढोणे मालन सुरेश, मा.श्रीमती ढवण शारदाबाई दिगंबर, मा.श्रीमती शिंदे शिला अनिल, मा.श्री. शेलार नितीन शिवाजी व मा.श्री. शेंडगे संजय छगन यांचा विरोध.

सदर विषयांचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-३**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४० शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

ठराव क्रमांक - ४० शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६१ मधील बुरूडगांव अंतर्गत श्री. शिवाजी बोरगे घर ते श्री. साळवे घर व श्री. देवकर घर ते श्री.कांबळे घर ते श्री.जाधव घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे चे कामास व एस्टीमेट रूपये १,५०,१८३/- चे खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- १] कामाचे नांव :- प्र.क्र. ६१ मध्ये बुरूडगांव अंतर्गत शिवाजी बोरगे घर ते साळवे घर व देवकर घर ते कांबळे घर ते जाधव घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- ६१

३]सुचविणा-यांचे नांव:- मा. सौ. सिमा भाउत्साहेब ठाकर (नगरसेविका)

४] लेखाशिर्ष :-

| | | |
|---|---|---|
| | अ] नांव :- | मागासवर्गीय कल्याणकारी योजना |
| | ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- |
| | क] यापुर्वीचा खर्च :- | रू. २२,२०,१००/- |
| | ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. १,५०,१८३/- |
| | इ] एकुण खर्च :- | रू. २३,७०,२८३/- |
| | ई] शिल्लक :- | रू. २६,२९,७१७/- |

५] सद्यस्थिती :- सद्यस्थितीत असलेली पी.व्ही.सी. लाईन बरेच / लिकेज नादुरूस्त आहे. तर त्या ठिकाणी जी.आय. ६५ एमएम पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | | मीटर | रूंदी | | मीटर |
| ब] पाईप लाईन | लांबी | २२५ | मीटर | व्यास | ६५ | एमएम |
| क] गटर | लांबी | | मीटर | | | |
| ड] इमारतीचे क्षेत्रफळ | | | | | | |
| इ ] इतर | | | | | | |
| ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | ------ | | | | | |

| | |
|---|---|
| ७] दरसुची :- | म.जि.प्रा. २००८-०९ |
| ८] अंदाजपत्रकीय रक्कम :- | रू. १,५०,१८३/- |

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२४/७/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६१ मधील बुरूडगांव अंतर्गत श्री. शिवाजी बोरगे घर ते श्री. साळवे घर व श्री. देवकर घर ते श्री.कांबळे घर ते श्री.जाधव घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे चे कामास व एस्टीमेट रूपये १,५०,१८३/- चे खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री. शेंडगे सं.छ.:- मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत करावयाची व दहा लाखापेक्षा कमी खर्चाची कामे स्थायी समिती सभे मध्ये घेउन्न नयेत असे ठरलेले होते.

मा.श्री.पवार बा.रे.:- या कामाची आवश्यकता आहे की नाही हे पहिले आहे का?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-कामाची आवश्यकता आहे की नाही हे पहाणेचे पंधरा दिवस पुर्वी ठरलेले आहे. आजच मी पंधरा कामाची पहाणी केली त्याची काहीच आवश्यकता नसल्याने ती मी रद्द केलेली आहेत. आपली पॉलिसी ठरण्या पूर्वी चा हा विषय आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गतचे रू.१ लाखाचे विषय असले तरी मान्यते साठी स्थायी समिती कडे पाठवायाचे नाहीत असे पूर्वी ठरले नुसार समान पध्दतीने कामे करून कामाची माहिती मा.स्थायी समिती सभेकडेस पाठविणेत येत होती. मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत विषय मा.स्थायी समिती सभेकडेस पाठवित नव्हतो आता स्थायी समिती आली आपणांस रूपये दहा लाखाचे आतील प्रस्ताव मा.स्थायी समिती कडेस पाठवू नये असे ठरवावे.

मा.सभापती साहेब :- दहा लाखाचे आतील प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती सभे कडेस पाठविण्यात यावेत. कामाची आवश्यकता पहावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत दहा लाखाचे आतील प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समिती सभेकडेस पाठविण्यात यावेत.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६१ मधील बुरूडगांव अंतर्गत श्री. शिवाजी बोरगे घर ते श्री. साळवे घर व श्री. देवकर घर ते श्री.कांबळे घर ते श्री.जाधव घरापर्यत ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे चे कामास व एस्टीमेट रूपये १,५०,१८३/- (रूपये एक लाख पन्नास हजार एकशे त्र्याऐंशी फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

तसेच मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत करावयाची रूपये दहा लाखाचे आतील रकमेचे प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती सभे कडेस पाठविण्यांत यावेत.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-३**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४१ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

ठराव क्रमांक - ४१ शुक्रवार दिनांक ३१/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४९ मधील बौध्द वस्ती अंतर्गत ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ४,९५,६८०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर** :- १] कामाचे नांव :- प्र.क्र. ४९ मधील बौध्द वस्ती अंतर्गत ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणे.

२] प्रभाग क्रमांक :- ४९

३]सुचविणा-यांचे नांवः- मा. सौ. नंदा मनेष साठे , (नगरसेविका)

४] लेखाशिर्ष :-

| | | |
|---|---|---|
| अ] नांव :- | मागासवर्गीय कल्याणकारी योजना |
| ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. ४२,७०,७३०/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. ४,९५,६८०/- |
| इ] एकुण खर्च :- | रू. ४७,६६,४१०/- |
| ई] शिल्लक :- | रू. २,३३,५९०/- |

५] सद्यस्थिती :- सद्यस्थितीत असलेली पी.व्ही.सी. लाईन बरेच / लिकेज नादुरूस्त आहे. तर त्या ठिकाणी जी.आय. ६५ एमएम पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | | मीटर | रूंदी | | मीटर |
| ब] पाईप लाईन | लांबी | ३२० | मीटर | व्यास | ३०० | एमएम |
| क] गटर | लांबी | | मीटर | | | |
| ड] इमारतीचे क्षेत्रफळ | | | | | | |
| इ ] इतर | | | | | | |
| ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | | | | | | |

७] दरसुची :- म.जि.प्रा./सा.बा.वि. २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. ४,९५,६८०/-

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२४/७/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४९ मधील बौध्द वस्ती अंतर्गत ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ४,९५,६८०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब:-प्रभाग क्रमांक४९ मधील गटर करणेचे कामास प्रशासकीय मंजूरी देणेचा विषय आहे.

मा.श्री.पवार बा.रे. :- कामाचा आवश्यकता पाहून निर्णय घ्यावा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री.गव्हाळे वि.ना. :- मंजूर करण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ४९ मधील बौध्द वस्ती अंतर्गत ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये ४,९५,६८०/- (रूपये चार लाख पंच्याण्णव हजार सहाशे ऐंशी फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गव्हाळे विजय नाना सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
हमदनगर महानगरपालिका.